

# ७. मला शाबासकी नको

या गोष्टीला आता बरीच वर्षे झाली आहेत.

शाळेची घंटा झाली. गुरुजी वर्गात आले. आदल्या दिवशी गुरुजींनी मुलांना एक गणित सोडवायला दिले होते. वर्गात आल्याबरोबर गुरुजींनी मुलांच्या पाट्या बघायला सुरुवात केली. गुरुजींनी घातलेले गणित फार अवघड होते. त्यामुळे बहुतेक मुलांच्या पाट्या कोऱ्याच होत्या. चारपाच मुलांनीच ते सोडवण्याचा प्रयत्न केला होता; पण त्यांना ते सोडवता आले नव्हते. त्यांची उत्तरे चुकली होती. एका मुलाने मात्र ते अवघड गणित बरोबर सोडवले होते. त्या मुलाची पाटी पाहून गुरुजींना फार आनंद झाला. हातातली पाटी सर्व मुलांना दाखवत ते म्हणाले, “पहा, गोपाळने गणित बरोबर सोडवले आहे. आपल्या या वर्गातील सर्व मुलांत तो लहान आहे; पण सर्वांच्यापेक्षा तो हुशार आहे.” असे म्हणून गुरुजींनी ती पाटी गोपाळच्या हाती दिली आणि त्याची पाठ थोपटत ते म्हणाले, “शाबास! गोपाळ, शाबास!”

वर्गातली सगळी मुले त्या छोट्या गोपाळकडे कौतुकाने बघू लागली. गोपाळच्या चेहऱ्यावर मात्र आनंद नव्हता. तो

दु:खी दिसत होता. काय झाले कोणास ठाऊक! एकाएकी तो रडू लागला. त्याच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहू लागल्या. सर्व मुले आश्चर्याने त्याच्याकडे बघत राहिली. सगळा वर्ग एकदम चिडीचिप झाला. काय झाले हे गुरुजींनाही कळेनासे झाले. त्यांनाही प्रश्न पडला. शाबासकी दिल्यावर गोपाळला रडू का यावे? त्याच्याजवळ जाऊन प्रेमाने त्याच्या पाठीवरून हात फिरवत गुरुजींनी विचारले, "गोपाळ, अरे तुला रडायला काय झाले?"

कसेबसे आपले रडे आवरून गोपाळ म्हणाला, "गुरुजी, मला शाबासकी नको."

गुरुजी म्हणाले, "अरे, तू एकट्यानेच गणित बरोबर सोडवले आहेस. तू शाबासकी नको का म्हणतोस?"

डोळे पुसत गोपाळ कसाबसा बोलला, "गुरुजी, ते गणित मी सोडवले नाही. मला ते येत नव्हते. वरच्या वर्गातल्या



एका मुलाकडून ते मी सोडवून घेतले आहे. मला शाबासकी नको."

गोपाळचे हे उत्तर ऐकून गुरुजींनी त्याला जवळ घेतले. त्याच्या पाठीवरून हात फिरवत ते म्हणाले, "गोपाळ, मघाशी मला जेवढा आनंद झाला होता, त्याहीपेक्षा अधिक आनंद आता मला झाला आहे. तू खरे बोललास, शाबासकी नको म्हणालास. असे कबूल करायला फार मोठे धैर्य लागते. मोठेपणी तू आपले व आपल्या शाळेचे नाव काढशील."

गुरुजींचे हे बोल पुढे खरे ठरले. खोटी शाबासकी, नको म्हणणारा हा गोपाळ पुढे फार मोठा झाला. हा गोपाळ म्हणजेच भारतसेवक गोपाळ कृष्ण गोखले.



**प्रश्न :**

१. गुरुजींनी गोपाळला शाबासकी का दिली? २. शाबासकी मिळूनही गोपाळला रडू का आले? ३. गोपाळने आपल्या रडण्याचे कारण काय सांगितले? ४. 'मला शाबासकी नको' असे गोपाळने म्हटल्यावर गुरुजींना आणखी आनंद का झाला? ५. शाळेत घडलेल्या या प्रसंगावरून गोपाळचे कोणते गुण दिसून येतात? ६. याशिवाय आणखी कोणते चांगले गुण माणसाच्या अंगी असायला हवेत असे तुम्हांला वाटते?